# :: निवासी सहन प्लॉटचे खरेदीखत ::

शासकिंय किंमत रक्कम रुपये **४,३५,०००/-** व प्रत्यक्ष व्यवहार किंमत रक्कम रुपये **--------/-** (**अक्षरी रुपये ---------/- फक्त**) मिळकत मौजे **पिसादेवी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर** हद्यीतील मिळकत र.डी.स.र.डी. छत्रपती संभाजीनगर झोन नंबर **९.४** दर प्रति चौ.मी. **४८८०/-**

लिहुन घेणार : **अक्षय रुपराव निचत**
वय : ३० वर्षे, व्यवसाय : नौकरी
रा. पिसादेवी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर
**आधार क्र. ९९७० ७८०१ ९९००**
**PAN - BVKPN 4083 Q**

लिहुन देणार **१.** **भास्कर रामनाथ काळे**
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : शेती व व्यापार
रा. पिसादेवी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर
**आधार क्र. ४०७८ २८११ ८९४०**
**PAN - CDEPK 7956 G**

**२.** **दिपक रामनाथ काळे**
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : शेती व व्यापार
रा. पिसादेवी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर
**आधार क्र. ६६४२ ७८९१ ९८७४**
**PAN - BCTPK 1936 K**

कारणे खरेदीखत लिहुन देतोत की, मिळकत मौजे **पिसादेवी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर** येथील मिळकत **गट नंबर ३१,** यामधील लिहुन देणार यांच्या मालकी व ताब्यातील जमीनीची फेरफार क्र. ........... व खाते क्र. ............ अन्वये नोंद झालेली आहे.

**रेखांकन अंतिम मंजुरी आदेश पत्र** (Finally Approval for Demarcation) : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्याकडील जमीन उप-विभागणी ले-आऊटच्या मोजणी/सीमांकनासाठी अंतिम मंजुरी (Finally Approval for Demarcation) प्रमाणपत्र ज्याचे Proposal No. ३७११४०६, Proposal code : AMRDA-२६-६२९७१, Approval No. AMRDA/LF/२०२६/APL/००८५०, Date ०७/०८/२०२६ असा असुन **अंतिम** मंजुरी मिळालेली असुन या मंजुर रेखाकंनामध्ये **एकुण १ ते १४ प्लॉट्स** पाडलेले असुन सदर रेखांनास हे ''...................... '' या नावाने ओळखले जाते.

## : विक्री प्लॉटचे वर्णन :

वरील प्रमाणे मिळकत मौजे **पिसादेवी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर** येथील मिळकत **गट नंबर ३१,** यातील '' .......................... '' यामंजुर रेखांकनामधील **प्लॉट नंबर १०,** ज्याचे एकुण क्षेत्रफळ ९१.४४० चौ.मी. असुन (रोड कर्व्हे क्षेत्र -३.१४० चौ.मी. वजा जाता) **विक्री योग्य क्षेत्रफळ ८८.३०० चौ.मी.** आहे जो तुम्हांस कायमस्वरुपी विक्री केले असुन ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | **ॲमेनिटी प्लॉट,** |
| पश्चिमेस | : | **६.०० मीटर रुंद रोड.** |
| दक्षिणेस | : | **९.०० मीटर रुंद रोड.** |
| उत्तरेस | : | **प्लॉट नंबर ०९.** |

येणे प्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील मिळकत आम्ही आमच्या गरजेच्या पुर्ततेसाठी आर्थिक गरज भासल्याने तुम्हांस एकुण किंमत रक्कम रुपये **--------/-** (**अक्षरी रुपये ---------/- फक्त**) मध्ये कायमस्वरुपी विक्री केले असुन तदंगभुत वस्तु सहित प्रत्यक्ष मालकी व ताब्यातही दिले आहे.

तसेच सदरील विक्री मिळकत आम्ही यापुर्वी कोणासही विक्री, गहाण, दान, तारण, बक्षीस वगैरे दिलेली नसुन सर्वतोपरी निर्विवाद व दोषमुक्त आहे. विक्रीची संपुर्ण किंमत रक्कम रुपये **--------/-** (**अक्षरी रुपये ---------/- फक्त**) हे आम्हाला तुमच्याकडून खालील प्रमाणे मिळाले.

| | | |
|---|---|---|
| १) रु. | बँक - | |
| | शाखा - | |
| | चेक नंबर | दिनांक |
| | अन्वये मिळाले. | |
| २) रु. | बँक - | |
| | शाखा - | |
| | याबँकेचा गृह कर्ज प्रकरणाचा | |
| | चेक नंबर | दिनांक |
| | अन्वये मिळाले. | |

------------------------------

**एकुण -------------**

अशा प्रकारे विक्रीची संपुर्ण किंमत रक्कम रुपये **--------/-** (**अक्षरी रुपये ---------/- फक्त**) हे आम्हाला वरील प्रमाणे मिळाले असुन रकमेच्या भरणा व मिळकतीच्या ताब्याबाबत वाद शिल्लक राहीला नाही.

सदरील मिळकत पुर्ण पणे दोषमुक्त असुन त्यावर कोणत्याही बॅकेचे राज्य सरकारचे, (निमसरकारी) सोसायटीचे अथवा खाजगी कर्ज, दान, गहाण, बोजा बक्षिस वगैरे निघाल्यास ते भरण्याची संपुर्ण जवाबदारी ही लिहून देणार यांच्यावर राहील.

सदरील मिळकतीचा ताबा आम्ही आज रोजी तुम्हास प्रत्यक्ष जागेवर दिला असून तुम्ही त्याचा उपयोग एकमेव मालक व कब्जेदार म्हणून उपभोग घ्यावा त्यास आम्ही स्वतः आमचे घरातील इतर व्यक्ती वारस हस्तक किंवा त्रयस्त व्यक्ती कोणीही अडचण करणार नाही तुमच्या मालकी कब्जात कोणीही अडथळा केल्यास तो निवारण्याची संपुर्ण जवाबदारी आमच्यावर राहील व ती आमच्या स्वःखर्चाने निवारण करुन देईल, त्याची तोशीष तुम्हास लागु देणार नाही.

आज पासुन या लेखा आधारे तुम्ही सदरील मिळकतीचे संपुर्णपणे मालक व हक्कदार झाला आहात. मालकी हक्काने अनिर्बंधपणे वंशपरंपरेने उपभोग घ्यावा. त्यात जर कोणी काही वाद आडी अडथळा वगैरे निर्माण केल्यास त्याचे निवारण आम्ही स्वतः करुन देईल. तुम्हांस त्याची तोषीस लागु देणार नाही.

सदरील मिळकती बाबत कोणताही वाद कोणत्याही न्यायालयात, कार्यालयात अथवा कुठल्याही अधिकाऱ्यासमोर आज चालू नाही. तसेच सदरील मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारची भु-संपादनाची कार्यवाही झाली नाही किंवा चालू नाही.

तसेच सदरील दस्तामध्ये लिहीलेल्या मजकुरास लिहुन देणार व लिहुन घेणार हे दोघेही जवाबदार असुन सदरील टंकलिखीत मजकुरामध्ये भविष्यात काही चुक आढळुन आल्यास व दस्तासंबंधी कोणतेही दस्त म्हणजेच दुरुस्ती पत्र, संमतीपत्र अथवा इतर दस्त करण्याची आवश्यक्ता भविष्यात भासल्यास लिहुन देणार हे विनाउजर विना मोबादला करून देतील.

तसेच यापुढे सदरील मिळकतीचे हद्दीपावेतोचे येणारे सर्व प्रकारचे कर व चार्जेस यातील लिहुन घेणार यांनीच भरावयाचे आहेत. तसेच सदर व्यवहारास लागणारा खरेदीखताचा संपुर्ण खर्च ठरल्या प्रमाणे यातील लिहुन घेणार यांनीच केलेला आहे.

सदरील मिळकतीचे तुम्ही पुर्णपणे मालक व कब्जेदार झाला असुन तुम्ही तुमचे नांव ७/१२ रेकॉर्डला व इतर सर्व महसुल रेकॉर्डला मालक म्हणुन नाव लावून घ्यावे त्यासाठी आमची काहीही उजर तक्रार नाही. त्या करीता काही कागद पत्र व आमच्या सह्या लागल्यास त्या आम्ही करुन देऊत.

असे की, साक्षीदार हे लिहून घेणार व देणारांना प्रत्यक्ष ओळखतात व सदरील दस्त हा लिहून घेणार व देणार यांनी वाचुन समजुन घेतला व तो त्यांना मान्य व कबुल आहे, व साक्षीदारांसमक्ष त्यांनी दस्तावर सह्या / अंगठे टेकवले आहेत.

तसेच दस्तासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या वैधतेची जबाबदारी आणि भविष्यात मिळकती संबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यास फक्त लिहुन देणार हे जबाबदार राहतील त्यास कार्यालयीन कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी अथवा इतर कुणीही जबाबदार राहणार नाहीत, हे देणारांना मान्य आहे.

सबब करीता हे खरेदीखत आमच्या स्वईच्छेने, राजीमर्जीने व कुटुंबाच्या संमतीने आपसात चर्चा करुन समजुन, उमजुन, कोणत्याही दबावाला बळी न पडता खालील साक्षीदांसमक्ष सदर दस्तावर सहया,अंगठे करुन तुमच्या मालकी हक्कात लिहुन व नोंदवुन दिला जो आमच्या सांगण्यावरुन टंकलीखीत करण्यात आला व जो आम्हाला वाचवुन दाखविला जो की बरोबर आहे फक्त.
दिनांक - **२२/०९/२२०६** दस्तुर - बी.बी.बलांडे

<u>लिहुन देणार</u>

**१. भास्कर रामनाथ काळे**

**२. दिपक रामनाथ काळे**

लिहुन घेणार

**अक्षय रुपराव निचत**

साक्षीदार :

१.